नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०४/११/२०२६ (बुधवार)

मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये नागपूर ग्रामिण पोलीसांकडून दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांना एकूण ४१,९७,९३२/— रुपयाची आर्थिक मदत

राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना मदतीचा हात देण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांनी सामाजिक बांधिलकी जपत मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये एक दिवसाचे वेतन जमा करून आर्थिक मदत केली आहे.

शासकीय परिपत्रक क्र. संकीर्ण—११२६/प्र. क्र. १२३/(ई. १८८९७९२) आरक्षण — १. दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ नुसार राज्यात यावर्षी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी बांधवाच्या मदतीसाठी, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ आणि राज्य सरकारी कर्मचारी मध्यवती संघटना, महाराष्ट्र महासंघाशी संलग्न सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

सदर शासन निर्णयानुसार मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनातून नागपूर ग्रामीण पोलीस येथील अधिकारी व अंमलदार यांनी आपले एक दिवसीय वेतनाची मदत केली असुन, मुख्यमंत्री सहायता निधिमध्ये नागपुर (ग्रामीण) पोलीसांकडून एकूण ४१,९७,९३२/— **(एकेचाळीस लाख सत्त्याण्णव हजार नऊशे बत्तीस)** रुपयांची आर्थिक मदत ही शेतकरी बांधवांना करण्यात आली आहे. या उपक्रमातून नागपूर ग्रामीण पोलीस दलाने नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत सामाजिक संवेदनशीलता व कर्तव्यनिष्ठेचे दर्शन घडविले आहे.

जानेवारी ते आक्टोंबर २०२६ मध्ये रस्ते अपघातातील मृत्युच्या संख्येत घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र राज्यात नागपूर ग्रामीण जिल्ह्याला दुसरे स्थान प्राप्त

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघातातील मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ (जानेवारी ते आक्टोंबर) मध्ये सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघातातील मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे. सन २०२६ (जानेवारी ते आक्टोंबर) या कालावधीत सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघातातील मृत्यूंमध्ये २३ टक्क्यांनी घट झाली आहे तसेच, महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातातील मृत्युच्या संख्येत घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने दुसरे स्थान प्राप्त केले आहे. सन २०२६ (जानेवारी ते आक्टोंबर) या कालावधीत महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातातील मृत्युमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये मध्ये नागपुर ग्रामीणला सातत्याने पहील्या पाच मध्ये स्थान प्राप्त झाले आहे.

देशातील रस्ते अपघाताच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्ह्यांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (**SaveLife Foundation**) यांच्या तांत्रिक सहकार्याने **Zero Fatality District (ZFD)** उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच जुलै २०२६ पासून **Dynamic Enforcement Action Plan** हा अभिनव उपक्रम **SaveLIFE Foundation** यांच्या तांत्रिक सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आला आहे.

सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (**CMO**) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्वसमावेशक आणि माहितीवर आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. अपघातप्रवण ठिकाणांचे विश्लेषण, प्रभावी वाहतूक नियंत्रण, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती अशा उपाययोजनांद्वारे अपघातातील मृत्युचे प्रमाण कमी करण्यावर भर देण्यात येत आहे.

नागपूर ग्रामीण पोलीसांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी मिळत असून, नागरिकांचे प्राण वाचविणे आणि रस्ते अपघातांमुळे होणारी जीवितहानी कमी करणे या उद्दिष्टांच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती साध्य होत आहे.

MAHARASHTRA STATE

Total Killed Comparative " Descending Order "

Sr. No	POLICE UNIT	JAN TO OCT 2025			JAN TO OCT 2026			COMPARATIVE % (JAN TO OCT 2025- 2026)		
		Total Accident	Total Killed	Total Injured	Total Accident	Total Killed	Total Injured	Total Accident	Total Killed	Total Injured
1	Amravati City	343	61	333	343	79	337	0	30	1
2	Thane City	809	194	775	953	233	860	18	20	11
3	C.S.Nagar City	525	146	462	572	168	495	9	15	7
4	**Dhule**	580	309	627	626	350	654	8	13	4
5	Palghar	394	230	209	426	259	288	8	13	38
6	Gondia	286	152	197	287	167	218	0	10	11
7	Latur	670	302	450	697	329	460	4	9	2
8	Raigad	540	212	682	555	228	625	3	8	-8
9	MB-VV	624	153	556	720	163	637	15	7	15
10	Pune City	1139	253	855	1208	267	947	6	6	11
11	Parbhani	425	202	361	423	213	330	0	5	-9
12	**Satara**	801	398	601	799	417	602	0	5	0
13	**Nanded**	744	400	443	735	406	395	-1	1	-11
14	Navi Mumbai	668	237	598	771	237	711	15	0	19
15	Amravati R	413	249	340	382	246	350	-8	-1	3
16	Thane R	359	205	309	359	202	322	0	-1	4
17	**Solapur R**	997	583	1056	963	573	986	-3	-2	-7
18	**Jalgaon**	780	408	677	716	401	552	-8	-2	-18
19	Kolhapur	908	334	835	823	328	739	-9	-2	-11
20	**Pune R**	1636	843	1303	1686	825	1165	3	-2	-11
21	PCPC	1057	331	956	1149	323	1133	9	-2	19
22	**Nasik R**	1270	802	1629	1329	782	1746	5	-2	7
23	**C.S.Nagar R**	697	452	386	736	439	515	6	-3	33
24	Jalna	608	307	606	565	298	532	-7	-3	-12
25	Wardha	294	147	301	310	140	254	5	-5	-16
26	Mumbai City	2163	309	2265	2219	294	2334	3	-5	3
27	Ratnagiri	292	110	369	317	104	434	9	-5	18
28	Chandrapur	619	292	497	626	271	531	1	-7	7
29	**Sangli**	839	448	636	801	415	654	-5	-7	3
30	Solapur City	219	76	184	186	70	144	-15	-8	-22
31	Hingoli	357	202	304	352	186	321	-1	-8	6
32	Beed	668	371	454	671	338	419	0	-9	-8
33	Washim	262	171	182	283	153	268	8	-11	47
34	Buldhana	594	337	510	539	300	381	-9	-11	-25
35	Yavatmal	751	356	456	579	314	373	-23	-12	-18
36	Sindhudurg	160	73	239	150	64	183	-6	-12	-23
37	Nandurbar	277	169	366	263	145	401	-5	-14	10
38	Nagpur City	1001	253	976	949	216	957	-5	-15	-2
39	**Ahilyanagar**	1741	769	1419	1439	655	1110	-17	-15	-22
40	Bhandara	321	145	323	294	122	316	-8	-16	-2
41	Akola	373	161	329	409	130	346	10	-19	5
42	Nasik City	423	174	393	479	140	446	13	-20	13
43	Dharashiv	559	335	537	459	264	439	-18	-21	-18
44	Nagpur R	813	385	855	708	295	840	-13	-23	-2
45	Gadchiroli	194	129	166	209	96	329	8	-26	98
TOTAL		30193	13175	27007	30065	12645	27079	-0.4	-4	0.3

Page 1

वन्यप्राण्यांचे अपघात रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश

जिल्हा व्याघ्र समिती ची बैठक मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या अध्यक्षेखाली पोलीस अधीक्षक कार्यालय,नागपुर ग्रामीण, नागपुर येथे पार पाडली होती, सदर बैठकीमध्ये जिल्हा व्याघ्र समितीचे अध्यक्षांनी NHAI विभागाला काही सुचना दिल्या होत्या, त्या सुचनांची अंमलबजावणी NHAI विभागाकडुन खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

वन्यजीव प्राण्यांसाठी तयार करण्यात आलेल्या बायपास रस्त्यांची साफ सफाई करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या, त्याअनुषंगाने NHAI विभागाने NH-44 चा मानेगाव (खवासा बॉर्डर) पासून चोरबाहुली गावापर्यंतचा पट्टा पीटीआरच्या वनक्षेत्रात निश्चित केलेल्या ठिकाणी वन्यजीव संरक्षणासाठी नऊ उपाययोजना/रचना बांधण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, पीसीसीएफ (वन्यजीव) यांच्या मंजुरीनुसार, या महामार्गावर अलीकडेच चेन–लिंक कुंपण आणि नॉईज बॅरीअरची कामे पुर्ण करण्यात आली असुन महामार्गाच्या दोन्ही बाजुला २ मिटर उंचीचे अंदाजे १९ किमी अंतरापर्यत साखळीचे कुंपण लावण्यात आले. तसेच वन्यजिवांना महामार्गावर येण्यापासुन रोखण्यासाठी महामार्गावर दोन्ही बाजुला २ मिटर उंचीचे अंदाजे ४ किमी लांबीचे नॉईज बॅरीअर लावण्यात आले. उर्वरित मार्गावरील वरील चेन–लिंक कुंपण हे वन्यजीवांना महामार्गावर येण्यापासून रोखण्यासाठी आणि त्यांना निश्चित केलेल्या भुयारी मार्गांकडे मार्गदर्शन करण्यासाठी आहे. तथापि, सार्वजनिक संपर्क कायम ठेवण्यासाठी गावांच्या हद्दीत आणि प्रवेश रस्त्यांवर कुंपण लावण्यात आलेले नाही. असे प्रवेशमार्ग ओळखण्यासाठी आणि वन्यजीवांना राष्ट्रीय महामार्गावर येण्यापासुन रोखण्यासाठी आवश्यक त्या–त्या ठिकाणी वनविभागामार्फत उपायायोजना करण्यात येत आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, नागपुर यांनी यापूर्वी वन्यप्राण्यांचे अपघात घडलेल्या ठिकाणांचा आढावा घेऊन भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी रंबलर्स (Rumble Strips), सूचना फलक व वेगमर्यादेचे फलक लावण्यात यावेत, वन्यप्राण्यांच्या सुरक्षित हालचालीसाठी उपलब्ध असलेल्या अंडरपास, ओव्हरपास व इतर सुविधांची नियमित देखभाल करण्यात यावी, वन विभाग, पोलीस विभाग व छभ्प यांनी परस्पर समन्वय ठेवून अपघात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग व इतर मार्गांवर वन्यप्राण्यांच्या वाढत्या अपघातांच्या घटनांची गंभीर दखल घेण्यात आली आहे.


vivo V30e
10/18/2026, 17:34









पोलीस स्टेशन काटोल यांनी सराईत गुन्हेगार
सबदर उर्फ शब्दर अशरफ उर्फ अकरम अली याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन काटोल :– पोलीस स्टेशन काटोलच्या अभिलेखावरील **सराईत आरोपी नामे सबदर उर्फ शब्दर अशरफ उर्फ अकरम अली, वय ३३ वर्ष, रा. चौबे ले आऊट, काटोल ता. काटोल, जि. नागपूर** याचे विरूध्द नागपूर ग्रामीण अंतर्गत पोलीस स्टेशन काटोल येथे शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द **(साथीदारांसह खंडणी वसुल करण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, अश्लील शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी देणे व साथीदारांसह अवैद्य जुगार खेळणे)** ईत्यादी संबंधाने अनेक गुन्हे नोंद असुन नमुद आरोपी हा असे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली असुन तो समाजासाठी धोकादायक ठरत असुन त्याचे बद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली काटोल पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, जि. नागपुर यांनी सराईत गुन्हेगार सबदर उर्फ शब्दर अशरफ उर्फ

अकरम अली, वय ३३ वर्ष, रा. चौबे ले आऊट, काटोल ता. काटोल, जि. नागपूर याचे विरूध्द एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्दतेचा आदेश काढला असुन काटोल पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक ०४/११/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेवुन मध्यवर्ती कारागृह ऑर्थर रोड, मुंबई येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.



सबदर उर्फ शब्दर अशरफ उर्फ अकरम अली

पोलीस स्टेशन खापा यांनी सराईत गुन्हेगार अमर बंडुजी सराटे याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन खापा :– पोलीस स्टेशन खापाच्या अभिलेखावरील **सराईत आरोपी नामे अमर बंडुजी सराटे, वय २२ वर्ष, रा. आजनी शेरडी, ता. सावनेर, जिल्हा नागपुर** याचे विरूध्द नागपूर ग्रामीण अंतर्गत पोलीस स्टेशन खापा येथे शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द **(साथीदारांसह घरफोडी करणे, मोटर सायकल चोरी करणे, गंभीर दुखापत करणे, आगळीक करणे, खोडसळपणा करणे व अश्लील शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी देणे)** ईत्यादी संबंधाने अनेक गुन्हे नोंद असुन नमुद आरोपी हा असे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली असुन तो समाजासाठी धोकादायक ठरत असुन त्याचे बद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली खापा पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, जि. नागपुर यांनी सराईत गुन्हेगार अमर बंडुजी सराटे, वय २२ वर्ष, रा. आजनी शेरडी, ता. सावनेर, जिल्हा नागपुर याचे विरूध्द एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्दतेचा आदेश काढला

असुन खापा पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक ०४/११/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेवुन मध्यवर्ती कारागृह चंद्रपूर येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.



अमर बंडुजी सराटे

पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी सराईत गुन्हेगार पिंटु उर्फ चिंटु उत्तमराव सोनुले याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन जलालखेडा :– पोलीस स्टेशन जलालखेडाच्या अभिलेखावरील सराईत आरोपी नामे **पिंटु उर्फ चिंटु उत्तमराव सोनुले, वय २९ वर्ष, रा. थुगावदेव (देवग्राम), ता. नरखेड, जि. नागपूर** याचे विरूध्द नागपूर ग्रामीण अंतर्गत पोलीस स्टेशन जलालखेडा येथे शरीराविरुध्द **(साथीदारांसह खुनाचा प्रयत्न करणे, विनयभंग करणे व गंभीर दुखापत करुन शिवीगाळी करुन जिवाने मारण्याची धमकी देणे)** ईत्यादी संबंधाने अनेक गुन्हे नोंद असुन नमुद आरोपी हा असे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली असुन तो समाजासाठी धोकादायक ठरत असुन त्याचे बद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जलालखेडा पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, जि. नागपुर यांनी सराईत गुन्हेगार पिंटु उर्फ चिंटु उत्तमराव सोनुले, वय

२९ वर्ष, रा. थुगावदेव (देवग्राम), ता. नरखेड, जि. नागपूर याचे विरूध्द एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्दतेचा आदेश काढला असुन जलालखेडा पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक ०४/११/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेवुन मध्यवर्ती कारागृह वर्धा येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.



पिंटु उर्फ चिंटु उत्तमराव सोनुले

गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
३६ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :– मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एन.एम. सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री लसंते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्या नेतृत्वात मौदा पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण २४ लाख ७२ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक ०४/११/२०२६ रोजी मौदा पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी माथनी टोल नाका येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान ट्रक क्र. एम एच–४०/बी.जी–९०३० येताना दिसले. सदर ट्रक समोर ब्रेझा कार क्र. एम एच–४८/ए. के.–४१४० हे वाहन पायलेटिंग करीत असल्याचे आढळुन आले. दोन्ही वाहनाला रोडच्या कडेला थांबवुन पोलीसांनी ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये ३६ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ट्रक क्र. एम एच–४०/बी.जी–९०३० किंमती १२,००,०००/– रूपये, ब्रेझा कार क्र. एम एच–४८/ए. के.–४१४० किंमती ७,००,०००/–रूपये आणि ३६ गोवंश जनावरे किंमती ५,२५,०००/– रूपये, ०३ अॅडरॉईड मोबाईल असा एकुण किंमती २४,७२,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी आरोपी १) मेहबूब खान वल्द आसिफ खान, वय ३९ वर्षे, रा. पार्वती नगर, तंबाखू चाल नागपूर २) भूषण ऊर्फ कुणाल राजू इंगोले, वय २८ वर्षे, रा. मनिष नगर डीमार्टचे मागे नागपूर ३) शेख वसीम वल्द शेख वकील, वय ३१ वर्षे, रा. हसनबाग चौक, गल्ली नं. ०१, नागपूर ४) शारीक खान वल्द कुदरत उल्ला खान, वय ३१ वर्षे, रा. पठाणपुरा मुर्तीजापूर ता. मुर्तीजापूर, जि. अकोला यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ११(१), (ड), (ई) (एफ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), (ब), १, ९ महा. पशु सरक्षण अधि १९७६, सहकलम १२६(२), ३(५) भा. न्या. सं., सहकलम १७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ ते ४ यांना अटक करण्यात आली आहे.



अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ६१ हजार ३५० रूपयांचा मुद्देमाल जप्त कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :– दिनांक ०२/११/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, दयानगर जिल्हा परिषद शाळेचा मागे मैदानाजवळ खदान नं ३ येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे दयानगर जिल्हा परिषद शाळेचा मागे मैदानाजवळ खदान नं ३ येथे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राज अशोक रंगारी, वय ३६ वर्ष २) हर्ष मोहन धुर्वे, वय २५ वर्ष, दोन्ही रा. खदान नं ३, ता. पारशिवनी, जि. नागपुर यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. ०२ आरोपी घटनास्थळाहुन पळुन गेले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि** १) रोख रक्कम ३१००/–रूपये, ०४ अॅडरॉईड मोबाईल, ०१ आयफोन, इतर साहित्य असा एकुण ६१,३५०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद ०४ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०१ लाख ९२ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त अरोली पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :– दिनांक ०३/११/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, निमखेडा शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे निमखेडा शिवार येथे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) चंद्रमणी अर्खित सुनानी, वय ४५ वर्ष, २) प्रितम विनायक हरोडे वय २९ वर्ष, ३) पुरुषोत्तम आनंदरावजी शेंडे, वय ४५ वर्ष यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. ०२ आरोपी घटनास्थळाहुन पळुन गेले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि** १) रोख रक्कम २१००/–रूपये, ०३ मोटरसायकल किंमती १,९०,०००/–रूपये इतर साहित्य असा एकुण १,९२,२००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन अरोली येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन बेला :– दिनांक ०२/११/२०२६ रोजी बेला पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता **आरोपी नामे १) मख्खनसिंग मीरसिंग बावरी, वय ५० वर्षे, २) चत्तरसींग रामसिंग पटवा, वय ५१ वर्षे, दोन्ही रा. रूइखैरी, ता. जि. नागपुर** हे मौजा चिमनाझरी आश्रम शाळाजवळ स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरतांना मिळुन आले. त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने दोन्ही आरोपींचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर